# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## शुक्रवार, दिनांक ३१ मार्च, २०१७
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

*लक्षवेधी सूचना — (म.वि.प. नियम १०१ अन्वये) —*

*(१) (बुधवार, दिनांक २९ मार्च, २०१७ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली लक्षवेधी सूचना) —*
*सर्वश्री. अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, जयवंतराव जाधव, धनंजय मुंडे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे राज्य उत्पादन शुल्क मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यभरात अनेक ठिकाणी महापुरुष आणि गड किल्यांच्या नावांचा वापर बिअरबार परमीट रुम, मांसाहारी खानावळ, लोकनाट्य कला केंद्र तसेच देशी दारु विक्री केंद्रांना करण्यात येणे, अनेक ठिकाणी देव-देवतांच्या नावाचाही वापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, अनेक महापुरुषांच्या नावाचाही वापर अशा ठिकाणी होत असणे, शासनाने यापुर्वी देव-देवतांच्या नावाचा गैरवापर करण्यास प्रतिबंध करणे, तरीही अनेक ठिकाणी सर्रास महापुरुषांसह देव-देवतांच्या नावांचे फलक लावुन त्यांचा गैरवापर मोठ्या प्रमाणावर होत असणे, दारु विक्री केंद्र व बिअरबार सारख्या हॉटेलांना महापुरुष व देव-देवतांची नावे दिल्यामुळे त्यांच्या नावाची विटंबना होत असणे, समाजासाठी जे महापुरुष आदर्श आहेत अशा महापुरुषांच्या कार्याचा वारसा पुढच्या पिढीला देतांना गैरठिकाणी नावाचा वापर होत असल्यामुळे सर्वसामान्यांच्या भावना मोठ्या प्रमाणावर दुखावणे, व्यसनाधिनतेकडे आणि गैरमार्गाकडे घेऊन जाणाऱ्या व्यवसायाला आदर्श व्यक्ती आणि देव-देवतांची नावे देण्यास कायमस्वरुपी प्रतिबंध करुन अशा नावांचे फलक तातडीने काढून टाकण्यासाठी शासनाने कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(२) श्री. हेमंत टकले, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"चार्म्स हेरिटेज गृहसंकुल टावरी पाडा, कल्याण (पश्चिम) येथे स्थित असणे, ह्या गृहसंकुलाने आवश्यक क्षमतेची सेप्टीक टँक बांधली नसल्याने मागील सुमारे ५ ते ६ वर्षापासून त्यांच्या इमारतीचे सांडपाणी शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागील बाजुस मोकळया जागेत सोडण्यात येत असणे, त्यामुळे शंखेश्वर प्रेसिडेन्सी गृहसंकुलाच्या मागे मोठ्याप्रमाणात सांडपाण्याची दलदल निर्माण झालेली असणे, सदरहू*

*सांडपाण्याच्या दलदलीमुळे तेथील परिसरातील लहान मुलांच्या आरोग्याला धोका निमार्ण होणे, परिसरातील इमारतीच्या पायाला (स्ट्रक्चरला) यामुळे धोका निर्माण होणे, परिसरात डासांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ होणे, त्यामुळे मलेरिया व डेंगुच्या साथीची लागण होण्याचा धोका निर्माण होणे, नागरिकांनी वारंवार महानगरपालिकेत तक्रारी व निवेदन दिलेली असणे, महानगरपालिकेने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलास नोटीस बजावणे, आरोग्य केंद्राच्या पथकामार्फत सर्वेक्षण करणे, या व्यतिरिक्त कोणतीही कार्यवाही न करणे, याबाबत तातडीने चार्म्स हेरिटेज गृहसंकुलावर त्यांच्या इमारतीतून मोकळया जागेत सोडण्यात येणारे सांडपाणी बंद करुन योग्य ती कारवाई करणे आवश्यक असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची उपाययोजना."*

*(३) श्रीमती विद्या चव्हाण, सर्वश्री. हेमंत टकले, किरण पावसकर, धनंजय मुंडे, ॲड. जयदेव गायकवाड, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री. नरेंद्र पाटील, रामराव वडकुते, ख्वाजा बेग, जयवंतराव जाधव, प्रा. जोगेन्द्र कवाडे, सर्वश्री. शरद रणपिसे, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, रामहरी रुपनवर, आर्कि. अनंत गाडगीळ, सर्वश्री. अमरनाथ राजूरकर, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, सतिश चव्हाण, ॲड. राहुल नार्वेकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"अंधश्रध्दा निर्मुलन समितीचे कार्याध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या साडेतीन वर्षापूर्वी तर कॉम्रेड गोंविद पानसरे यांची हत्या दोन वर्षापुर्वी करणारी सनातन संघटना आणि या दोघांच्या खुनाचे आरोपी असणारे एकच असणे, परंतु आजपर्यंत खुनाच्या कटासाठी वापरण्यात आलेली मोटर सायकल आणि पिस्तुल तपास यंत्रणेला न सापडणे, सी.बी.आय. ने आरोपींनी पिस्तुलातुन झाडलेल्या गोळया/पुगंळया स्कॉटलँड यार्ड च्या न्यायवैधक शाळेत पाठवुन दहा महिन्यानंतर ही त्यांनी अहवाल न देणे, कर्नाटकातील विचारवंत डॉ. एम.एम.कुलबुर्गी यांच्यासह दाभोलकर, पानसरे यांच्या हत्येचा कट एकाच उद्देशाने करण्यात येणे, तरी सुध्दा तीनही हत्यांचा तपास तीन वेगवेगळया तपास यंत्रणानी करणे, एक आरोपी समीर गायकवाड याच्यावर आरोप निश्चिती होणे तर डॉ. विरेंद्रसिंह तावडे या आरोपीवर अद्याप आरोप निश्चित न होणे. फरार आरोपी आकोलकर आणि पवार यांचा तपास यंत्रणांना सुगावा न लागणे, यामुळे जनतेमध्ये वाढत असलेला असंतोष आणि चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."*

*(४) सर्वश्री. आनंदराव पाटील, रामहरी रुपनवर, संजय दत्त, अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे मुख्यमंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"तांबवे (ता.कराड, जि.सातारा) येथे दिनांक २० फेब्रुवारी, २०१७ रोजी दुपारी २.३० च्या सुमारास गावाच्या बाहेर साधारण १ कि.मी. च्या अंतरावर पवारमळा स्मशानभूमीच्या जवळ कराडकडे परत येत असताना स्थानिक विधानपरिषद सदस्य यांना तांबवे जिल्हा परिषद गटातील उमेदवार श्री. प्रदिप जालिंदर पाटील व त्यांच्या सोबत असणाऱ्या २५ ते ३० लोकांच्या जमावाने पुर्वनियोजित कटाने दुचाकीवरुन पाठलाग करुन रस्त्यामध्ये गाडी अडवून सोबत असणाऱ्या अंगरक्षकाला धक्काबुक्की करणे, अर्वाच भाषेत शिवीगाळ करणे, सदरचा प्रकार पुर्वनियोजित कटानूसार व्हॉटसॲपव्दारे व हाताशी धरलेल्या न्युज चॅनेलव्दारे तात्काळ संपूर्ण महाराष्ट्रात प्रसारित करण्यात येणे, त्यामुळे स्थानिक विधानपरिषद सदस्यांची बदनामी करण्यात येणे, पुर्वनियोजित कट असल्याने विरोधी उमेदवारांने सहानभूतीचे वातावरण निर्माण करुन निवडणुकीमध्ये यश मिळविणे, अशा प्रकारचा गंभीर गुन्हा त्या दिवशी कराड तालुका पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर ७८/२०१७ नुसार दाखल झालेला असणे, या गंभीर प्रकरणाची स्थानिक पोलीस प्रशासनाकडून कोणतीच तात्काळ कार्यवाही न होणे, त्यामुळे स्थानिक जनतेत पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन संबंधीत प्रकरणी दोषींवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."*

*(५) सर्वश्री. धनंजय मुंडे, सुनिल तटकरे, अमरसिंह पंडित, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महसूल मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"शासनाने कंपनी करीता कंपनी कायद्यांतर्गत संपादित केलेला मौजे कोलशेत जि.ठाणे येथील स.न ९९(२) हा भुखंड औद्यौगिक प्रयोजनार्थ मे.ओरीएंटल इंडस्ट्रीज ने विकत घेणे, सदर भुखंडाचा औद्यौगिक प्रयोजनार्थ वापर न करता तो विकासकास विक्रीचा प्रयत्न करणे, सदर प्रयत्नास यश न आल्याने त्याचे हक्क विकासकास देणे, सदर अधिकाराच्या आधारे मे मॅन इन्फ्रा यांनी मौजे कोलशेत येथील ११४(४) व ११५(२) या क्षेत्रा समवेत स.न ९९(२) सह एकत्रीत विकास परवानगी संदर्भात अर्ज करणे, स.न ११४(४) व ११५(२) मध्ये आदिवासी कुळ असतांना व स.न. ९९(२) ही जमीनीच्या ७/१२ वर भोगवटदार वर्ग २ चा उल्लेख असतांना महानगरपालिका, ठाणे यांनी तिन्ही सर्व्हे नं. च्या एकत्रीत आराखड्यात विकास परवानगी देणे,*

*यातील आरक्षित क्षेत्रात विकासहक्क देणे, महाराष्ट्र जमीन महसुल कायदा, १९६६ चे कलम ४२ अ व भुसंपादन अधिनियम व भुसंपादन (कंपन्या बाबतचे) नियम, १९६३ मधील तरतुदीचे उल्लंघन करणे, सदर विकास परवानगीचे आधारे विकासकाने सदर प्रकल्पाचे काम सुरु करणे, सदर प्रकल्पाची जाहीरात सुरु करणे, प्रदर्शनास स्टॉल लावुन सदनिका विक्री करुन या मालमत्तेत त्रयस्त हितसंबंध निर्माण करणे, पर्यायाने सर्वसामान्य गुंतवणुकदाराची गुंतवणुक व शासनाच्या हितसंबंधांना बाधा आणणे, या सर्व बाबी प्रधान सचिव(महसुल) तसेच प्रधान सचिव (वने, भुसंपादन), मंत्री, महसुल यांना दिनांक २५ जानेवारी, २०१७ चे पत्रान्वये निदर्शनास आणणे, त्याची दखल न घेतल्याने दिनांक १७ फेब्रुवारी, २०१७, दिनांक २२ फेब्रुवारी, २०१७ रोजी यासंदर्भात पुन्हा पत्र देवुन देखिल त्याची दखल न घेणे, याबाबत शासनाने करावयाची कारवाई व प्रतिक्रिया."*

*(६) ॲड. अनिल परब, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"वांद्रे (पूर्व ) येथील शासकीय वसाहतीची झालेली दयनीय अवस्था, माहे २०१६ मध्ये दोन वेळा छताचे प्लास्टर कोसळण्याच्या घडलेल्या घटना, तसेच इमारत क्रमांक एक मधील धोकदायक घराची दुरुस्ती सुरु असतांना स्वयंपाक घरातील छत कोसळले, शासकीय वसाहतीमध्ये एकूण ३७० इमारती असून त्यांचे सरासरी आर्युमान ४५ ते ५० वर्षाचे असणे, या शासकीय वसाहतीमधील ३७० पैकी ३६ इमारतीचे पुर्नबांधणीचे काम सन २०१४-१५ या अर्थसंकल्पात समाविष्ट असून त्याची अंदाजित किंमत रु. १००.८४ कोटी इतकी असून तसेच उर्वरित ३३४ इमारतींची अंतर्गत व बाहय संरचनात्मक व नुतनीकरणाच्या दृष्टिने कामे हाती घेण्यात येणार असून त्याकरिता सन २०१३-१४ या वित्तीय वर्षात रु. ३४.०४ कोटीची कामे करण्यात आल्याचे माहे जून, २०१४ मध्ये विधानपरिषदेत उपस्थित केलेल्या लक्षवेधी सूचनेला उत्तर देतांना मा.सार्वजनिक बांधकाम मंत्रीमहोंदयानी दिलेल्या लेखी उत्तरावरुन स्पष्ट होणे, परंतु प्रत्यक्षात २५ इमारतींची कामे सुरू असून अत्यंत धिम्म्यागतीने होत असल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास येणे, तर काही इमारतीची कामे अर्धवट अवस्थेत असणे, मा.सार्वजनिक बांधकाम मंत्र्यांनी प्रत्यक्षात सदर वसाहतीची पाहणी करुनही अद्यापी कोणतीच ठोस कार्यवाही झालेली दिसत नसणे, ठेकेदारांना वेळेत देयके मिळत नसल्याने इमारतीच्या उर्वरित कामांकरिता साहित्य आणण्यास होत असलेला विलंब, वसाहतीची दयनीय अवस्था*

*असतानाही इमारतीच्या दुरुस्तीकडे सबंधित अधिकाऱ्यांकडून जाणीवपूर्वक दुर्लक्ष होणे, वसाहतीतील इमारतीचे टप्प्याने दुरुस्तीचे काम हाती घेण्यात येत असणे, दरवर्षी हीच प्रक्रिया शासनाकडून करण्यात येत असणे, त्यामुळे या इमारती अतिशय जीर्ण अवस्थेत झालेल्या असल्यामुळे त्या पाडून पुर्नबांधणीचे काम हाती घेण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी शासकीय कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून निर्णय घेण्याची नितांत आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."*

*(७) डॉ. सुधीर तांबे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे शालेय शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यातील प्राथमिक शिक्षकांना MS-CIT परिक्षा उत्तीर्ण होण्यासाठी शासनाने २००८ च्या कालमर्यादा घालून दिलेली असणे, या बद्दलच्या शासन निर्णयातील संदिग्धतेमुळे अनेक शिक्षकांनी MS-CIT परिक्षा २००४ नंतर पुर्ण करणे, शासनाने कठोर निर्णय घेऊन शिक्षकांच्या वेतनवाढ रद्द करुन त्यांच्याकडून वसूली सुरु केलेली असल्याने शिक्षकांना मोठ्या प्रमाणात आर्थिक नुकसानीस सामोरे जावे लागणे, या संदर्भात शिक्षकांमध्ये निर्माण झालेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."*

*(८) सर्वश्री. सतिश चव्हाण, अमरसिंह पंडित, विक्रम काळे, अब्दुल्लाखान दुर्राणी, धनंजय मुंडे, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क प्रतिपूर्ती योजनेअंतर्गत उच्च शिक्षण व व्यावसायिक अभ्यासक्रमाचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्काच्या ५० टक्के प्रतिपूर्ती जाहीर केलेली असणे, पारंपारिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी उत्पन्न मर्यादा रु. २.५० लक्ष तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना उत्पन्न मर्यादा रु. ६.०० लक्ष ठरवलेली असणे, परंतु या योजनेच्या लाभासाठी विद्यार्थ्यांस १२ वी च्या परिक्षेत ६० टक्के गुण असण्याबाबतची अट असणे, व्यवस्थापन कोट्यातून व अभिमत विद्यापीठातून व स्वयं अर्थ सहाय्य विद्यापीठात वैद्यकिय अभियांत्रिकी शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही योजना लागू नसल्याने काही विद्यार्थ्यांवर अन्याय होत असणे, डॉ.पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजने अंतर्गत शहरात शिक्षण घेणाऱ्या अल्पभुधारक अथवा मजुरांच्या मुलांस प्रतिमाह रु. ३,०००/- तर पंडित*

*दिनदयाळ उपाध्याय स्वंय योजने अंतर्गत अनुसूचित जमातीच्या मुलास प्रतिमाह रु. ६,०००/- निर्वाह भत्ता जाहीर केल्याने यामध्ये आर्थिक भेदभाव केलेला असल्याने विद्यार्थ्यांमध्ये असंतोष निर्माण झालेला असणे. ई.बी.सी. धारक विद्यार्थ्यांना १२ वी च्या परिक्षेत ६० टक्के गुणाची अट रद्द करणे व व्यवस्थापन कोटा/अभिमत विद्यापीठात व स्वयंअर्थ सहाय्य विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या ई.बी.सी.धारक विद्यार्थ्यांना ही ई.बी.सी.ची सवलत मिळण्यासाठी व दोन्ही संवर्गातील विद्यार्थ्यांना समान निर्वाह भत्ता मिळण्यासाठी दिनांक १६ डिसेंबर, २०१६ रोजी लक्षवेधी सूचनेवर चर्चा होऊन यावर त्वरित सकारात्मक निर्णय घेण्याबाबत मा. उच्च व तंत्र शिक्षणमंत्री महोदयांनी आश्वासन दिलेले असणे, परंतु यावर अद्याप कोणतीच कार्यवाही झालेली नसल्याने विद्यार्थी व पालकांमध्ये असंतोष निर्माण झालेले असणे, तरी यावर सकारात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(९) श्रीमती हुस्नबानू खलिफे, सर्वश्री. आनंदराव पाटील, अशोक ऊर्फ भाई जगताप, अमरनाथ राजूरकर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे महिला व बाल कल्याण मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"राज्यशासनाच्या मनोधैर्य योजनेतून बलात्कार पिडीत महिला व मुलींना पुनर्वसनासाठी देण्यात येणारी ३ लाखाची आर्थिक मदत तुटपूंजी असून त्यातून समाधान होत नसल्याने शासनाने या योजनेचा पुनर्विचार करावा, असे मुंबई उच्च न्यायालयाने सूचविले असल्याचे दिनांक ९ मार्च, २०१७ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, एका १४ वर्षीय अल्पवयीन बलात्कारपिडीत मुलीला शासनाकडून या योजनेतून २ लाखाची मदत दिलेली असणे, परंतु त्यामुळे समाधान न झाल्याने या मुलीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केलेली असणे, या याचिकेवरील सुनावणीच्यावेळी नुकसान भरपाई असमाधान व्यक्त करीत मुंबईसारख्या शहरात पिडीतांना कसे जगता येईल, शिक्षणाचा खर्चही पूर्ण होणे शक्य नाही तसेच त्यांना देण्यात येणारी ३ लाखाची रक्कम तुटपूंजी आहे व शासनाकडे इतर योजनांसाठी पैसा आहे मात्र पिडीत महिलांना मदत देण्यात मात्र पैसा नसणे, हे योग्य नसून ज्याप्रमाणे गोवा राज्यात बलात्कार पिडीत महिलेला १० लाखाची नुकसान भरपाई देण्यात येते, त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनानेही गोव्याचा आदर्श ठेवावा, अशी सूचना केलेली असतानाही शासनाने या सूचनेची दखल न घेणे, त्यामुळे राज्यातील महिलांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व चिडीची भावना, त्यामुळे शासनाने निर्णय घेऊन बलात्कारपिडीत महिला व मुलींना गोवा सरकारच्या धर्तीवर मनोधैर्य*

*योजनेतून १० लाखाची मदत देण्याबाबत करावयाची तातडीची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

*(१०) श्री. सुजितसिंह ठाकूर, वि.प.स. पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्त्वाच्या बाबीकडे उद्योग मंत्र्यांचे लक्ष वेधतील :-*

*"जि.ठाणे खालापूर येथील, झेनिथ (बिर्ला) कारखाना मालक व व्यवस्थापनाने, बेकायदेशीर टाळे बंदी लागू केल्याचे निषेधार्थ कामगारांनी मुंबई येथील आझाद मैदानावर दिनांक ०६ फेब्रुवारी, २०१७ रोजीपासून बेमुदत उपोषण सुरु करण्यात येणे, सदरहू कारखाना मालक व व्यवस्थापनाने, तीन वर्षापासून सुरु केलेल्या टाळे बंदीमुळे, कायमस्वरुपी कामगारांसह कंत्राटी कामगारांवर कोसळलेले बेकारीचे व उपासमारीचे संकट, कामगारांनी विविध मागण्यासाठी आंदोलने करुनही, त्यांच्या मागण्या मान्य करण्याकडे कंपनी मालक व व्यवस्थापनाने दुर्लक्ष करुन, कंपनीस बेकायदेशीरित्या टाळे बंदी लागू करणे, कंपनी मालकाकडून सदरहू सेवा निवृत्त कामगार व कायमस्वरुपी कामगारांसह कंत्राटी कामगारांची कायदयाने देय असलेली देणी मिळावी याकरिता, कामगारांनी कुटुंबासह बेमुदत उपोषण सुरु करणे, यासंदर्भात उद्योग मंत्री व कामगार मंत्री, यांना कामगारांतर्फे मागण्यांचे निवेदन देण्यात येवूनही, अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगारांचा उदरर्निवाहाचा प्रश्न गंभीर होवून, त्यांच्यात निर्माण झालेले नैराश्याचे व चिंतेचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."*

## *(दुपारी १२.०० वाजता)*

*एक : प्रश्नोत्तरे.*

*दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे.*

*(१) मुख्यमंत्री : "लोणार जि.बुलढाणा नगरपरिषदेतील मुख्याधिकारी व करसंग्राहक श्री.जे.के.आंबोरे यांनी खोटी पावती पुस्तके छापून जनतेकडून लाखो रुपयांचा कर जमा केल्याप्रकरणी" या विषयावर तत्कालीन विधानपरिषद सदस्य श्री.पांडुरंग फुंडकर यांनी दिनांक ८ डिसेंबर, २०१० रोजी उपस्थित केलेल्या औचित्याच्या मुद्याबाबत दिलेल्या आश्वासनानुसार*

माहिती सभागृहासमोर ठेवतील.

(२) वस्त्रोद्योग मंत्री : "महाराष्ट्र राज्य वस्त्रोद्योग महामंडळ मर्यादित यांचा सन २०१५-२०१६ या वर्षाचा पन्नासावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) मत्स्यविकास मंत्री : "महाराष्ट्र मत्स्योद्योग विकास महामंडळ मर्यादित यांचा सन २०११-२०१२ व सन २०१२-२०१३ या वर्षांचा अनुक्रमे चाळीसावा व एकेचाळीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

तीन : "विमुक्त जाती व भटक्या जमाती कल्याण समितीचा अकरावा अहवाल सादर करणे."

चार : (क) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास).

(ख) म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने — (असल्यास).

पाच : म.वि.प. नियम १०१ - अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).

# - मध्यंतर -

सहा : शासकीय विधेयके -

(क) विधानसभेने संमत केल्यास - विधेयक विचारात घेणे -

सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र विनियोजन विधेयक, २०१७.

(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे.

(१) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६"

विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-

"सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५४ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन)(सुधारणा) विधेयक, २०१६ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

(१) उच्च व तंत्र शिक्षण (२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी

*मंत्री. पक्ष नेता तथा वि.प.स.*

*(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* *(४) श्री.नारायण राणे, वि.प.स.*

*(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*

*(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------

*(२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १ — मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७"*

------------------------------------------------------------------------

*(३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. शरद रणपिसे, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक २ — मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) मुख्यमंत्री* *(२) श्री. धनंजय मुंडे, विरोधी पक्ष नेता तथा वि.प.स.*

*(३) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* *(४) श्री.संजय दत्त, वि.प.स.*

*(५) ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स.* *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*

*(७) श्री.सतिश चव्हाण, वि.प.स.* *(८) डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------

*(४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र ग्रामपंचायत आणि महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) ग्रामविकास मंत्री* | *(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.* |
| *(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* | *(४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.* |
| *(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.* | *(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.* |
| *(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* | *(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(९) ॲड.अनिल परब, वि.प.स.* | *(१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.* |

---

*(५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. जयंत पाटील, बाळाराम पाटील, धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ४ - मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र महानगरपालिका आणि महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) मुख्यमंत्री* | *(२) श्री.जयंत पाटील, वि.प.स.* |

*(३) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*
*(४) श्री.सुनिल तटकरे, वि.प.स.*
*(५) श्री.हेमंत टकले, वि.प.स.*
*(६) श्री.संजय दत्त, वि.प.स.*
*(७) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(८) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(९) ॲड.अनिल परब, वि.प.स.*
*(१०) श्री.बाळाराम पाटील, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------
------

*(६) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ६ - महाराष्ट्र शेतजमीन (जमीनधारणेची कमाल मर्यादा) (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) महसूल मंत्री*
*(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*
*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.*
*(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.*
*(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.*
*(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*
*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.*
*(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------
------

*(७) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७" विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ७ - महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोग (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

-----------------------------------------------------------------------
------

*(८) "सन २०१६ चे वि.स.वि. क्रमांक ५३ - डॉ.विश्वनाथ कराड एमआयटी विश्वशांती विद्यापीठ विधेयक, २०१६"*

-----------------------------------------------------------------------
------

*(९) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक ९ — महाराष्ट्र परावैद्यक परिषद (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) वैद्यकीय शिक्षण मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |

*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------------

*(१०) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० – भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १० – भारतीय भागीदारी (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) मुख्यमंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*

*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*

*(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*

*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*

*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------------

*(११) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ – शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री. धनंजय मुंडे, शरद रणपिसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १२ – शिकाऊ उमेदवार (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) कौशल्य विकास व उद्योजकता मंत्री*
*(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*
*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.*
*(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.*
*(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.*
*(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*
*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.*
*(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------

*(१२) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १३ – महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

*(१) सहकार मंत्री*
*(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद*
*(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.*
*(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.*
*(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.*
*(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.*
*(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.*
*(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.*
*(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.*
*(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.*

------------------------------------------------------------------------

*(१३) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ – सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १५ — सिम्बॉयोसिस कौशल्य व मुक्त विद्यापीठ विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

---------------------------------------------------------------------------

*(१४) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७"*

*विधेयक प्रवर समितीकडे पाठविण्याबाबत श्री. धनंजय मुंडे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-*

*"सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १६ — महाराष्ट्र सहकारी संस्था (दुसरी सुधारणा) विधेयक, २०१७ खालील सदस्यांच्या प्रवर समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त दोन महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."*

| | |
|---|---|
| *(१) सहकार मंत्री* | *(२) श्री.धनंजय मुंडे, मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद* |
| *(३) श्री.नारायण राणे, वि.प.स.* | *(४) श्री.शरद रणपिसे, वि.प.स.* |
| *(५) ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स.* | *(६) श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.* |
| *(७) श्री.सतीश चव्हाण, वि.प.स.* | *(८) डॉ.(श्रीमती) नीलम गोऱ्हे, वि.प.स.* |
| *(९) श्री.कपिल पाटील, वि.प.स.* | *(१०) श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.* |

---------------------------------------------------------------------------

------

(१५) "सन २०१७ चे वि.स.वि. क्रमांक १७ —महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) विधेयक, २०१७"

-----------------------------------------------------------------

------

## — अशासकीय कामकाज —
## (बैठकीच्या अखेरचे २ १/२ तास)

सात : अशासकीय विधेयके —

(क) पुर:स्थापनार्थ -

(१) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र ज्येष्ठ नागरिक वयोमर्यादा विधेयक, २०१७ - श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

(२) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक २ - मोटार वाहन (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१७ - श्री.नरेंद्र पाटील, वि.प.स. यांचे.

(३) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ३ - महाराष्ट्र शेतकरी, कारागीर व भूमिहीन मजूर यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०१७ - श्री.रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

(४) सन २०१७ चे वि.प.वि. क्रमांक ४ - महाराष्ट्र स्वयंसेवी संस्था विकास व व्यवस्थापन महामंडळ विधेयक, २०१७ - श्री. रामहरी रुपनवर, वि.प.स. यांचे.

(ख) विचारार्थ -

(१) सन २०१६ चे वि.प.वि. क्रमांक ५ - मुंबई महानगरपालिका (सुधारणा) विधेयक, २०१६ - श्री.शरद रणपिसे, वि.प.स. यांचे.

(२) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २१ - महाराष्ट्र गुंठेवारी विकास (नियमाधीन करणे, श्रेणीवाढ व नियंत्रण) (सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

(३) सन २०१५ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन (सुधारणा) विधेयक, २०१५ - श्री.संजय दत्त, वि.प.स. यांचे.

(४) सन २०१४ चे वि.प.वि. क्रमांक २० - भ्रष्टाचार प्रतिबंध (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक, २०१४ - श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांचे.

*विधान भवन,*
*मुंबई,*
*दिनांक : ३० मार्च, २०१७.*

*उत्तमसिंग चव्हाण,*
*सचिव,*
*महाराष्ट्र विधानपरिषद.*